ISSN 2320-4494

Impact Factor 2.7286

# मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांचे कार्य व कर्तृत्व



मराठवाडा मुक्तिसंग्राम

अमृत ७५ महोत्सव

श्री. आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं.

ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

संलग्नित

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

# ई-संशोधन पत्रिका

## मुख्य संपादक
## डॉ. विनोद बोरसे

"POWER OF KNOWLEDGE"

*An International Multilingual Quarterly*

*Peer Review Refereed Research Journal*

## विशेष अंक
## मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांचे कार्य व कर्तृत्व


संपादकीय मंडळ

डॉ. नवनाथ आघाव

(प्राचार्य

डॉ. वसंत माळी

(उपप्राचार्य

डॉ. कृष्णा मालकर

(इतिहास विभाग प्रमुख

मुख्य संपादक

डॉ. विनोद बोरसे

प्राध्यापक इतिहास विभाग


कृपया नोंद घ्या

- या प्रकाशनामध्ये व्यक्त केलेले विचार हे पूर्णपणे लेखक व संशोधकाचे वैयक्तिक मत आहे. आणि श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय आणि संपादकीय मंडळ यांच्या लेखाचे विचार प्रतिबिंबीत करीत नाही.
- या प्रकाशनाचा कोणताही भाग कोणत्याही स्वरूपात लेखी पूर्वपरवानगी शिवाय पुनरुत्पादित केला जाऊ शकत नाही.


ISSN – 2320-4494



@ सर्व हक्क आरक्षीत



प्रकाशन आणि मुद्रण

श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव (रं. ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

# "POWER OF KNOWLEDGE"

## CONTENT


| अ.क्र. | संशोधकाचे नाव | शोध निबंधाचे शिर्षक | पान नंबर |
|---|---|---|---|
| १. | डॉ. संतोष रोहिदास पहारे | हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात जालना जिल्हयाचे योगदान: एक दृष्टिक्षेप | १ |
| २. | डॉ. कालिदास भांगे | हैदराबाद मुक्तिसंग्राम एक स्वातंत्र्याचा ऐतिहासिक लढा : समाजशास्त्रीय अभ्यास | ९ |
| ३. | डॉ. प्रकाश जनार्दनराव खेत्री | मराठवाडा मुक्तीसंग्रमात स्वातंत्र्यसेनानी क्रांतिवीर काकासाहेब देशमुख यांचे योगदान | १६ |
| ४. | प्रा.डॉ. एम.जी. मोरे | हैदराबाद मुक्तिसंग्रामात गोविंदभाई श्रॉफ यांचा सहभाग : एक ऐतिहासिक अभ्यास | २१ |
| ५. | राजश्री मधुकर लांडगे | पारधी समाजातील प्रथा – परंपरा आणि स्त्री | २३ |
| ६. | प्रवीण लक्ष्मण चिंतोरे | निजामशाही काळातील दख्खनी मुसलमान व परदेशी मुसलमान वाद : एक दृष्टिक्षेप | २९ |
| ७. | बालाजी भाऊसाहेब दळवे | माहिती अधिकार कायद्याचे जागतिक पातळीवरील स्वरूप व या कायद्याची भारतातील सद्यस्थिती | ३२ |
| ८. | स्वाती रमेश शेळके | मराठवाडा मुक्तिसंग्रामात महिलांचा सहभाग | ३६ |
| ९. | डॉ. भेलोंडे जगदीश व्यंकटराव | निजाम राजवटीविरुध्द कन्नड तालुक्यातील चळवळी | ४० |
| १०. | डॉ. राजामराम पिंपळपल्ले | हैद्राबाद संस्थानातील मुक्तिसंग्रामात मराठवाडयातील प्रमुख स्त्रियांचे योगदान | ४३ |
| ११. | डॉ. मधुकर लक्ष्मण हिवाळे | मराठवाडा मुक्तिसंग्राम : इतिहास, संघर्ष आणि प्रेरणा | ४८ |
| १२. | कृष्णा पुंजाराम खरात | समतेचे पुरस्कर्ते संत रविदास | ५३ |
| १३. | डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार | हैदराबाद संस्थानातील निलंगा येथील आर्य समाज प्रकरण | ५६ |
| १४. | कल्पना गिरे<br>डॉ. तुकाराम नारायण शिंदे | मराठवाडा मुक्तिसंग्रामातील महिलांचे कार्य व कर्तृत्व | ६२ |
| १५. | श्री. प्रभूदास रामदास बेराळे<br>डॉ. विलास श्रीरंग जाधव | मराठवाडा मुक्तिसंग्रामात महादेव कोळी जमातीचा निजामाशी संघर्ष | ६५ |

## हैद्राबाद संस्थानातील निलंगा येथील आर्य समाज प्रकरण

**डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार**
इतिहास विभागप्रमुख
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा
sbenjal@gmail.com

हैद्राबाद संस्थान हे देशातील अनेक संस्थानांपैकी भौगोलिक दृष्ट्या मध्यवर्ती असलेले एक महत्वाचे संस्थान होते. या संस्थानातील संस्थानिक धर्माने इस्लाम तर बहुसंख्य प्रजा हिंदू व इस्लामेत्तर होती. भारतीय स्वातंत्र्य चळवळीप्रमाणेच हैद्राबाद संस्थानातही प्रजेने विविध संघटनांच्या माध्यमातून तेथील संस्थानिक निजामाच्या विरोधात संघर्ष पुकारला होता. हा स्वातंत्र्य लढा १७ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने केलेल्या पोलीस कारवाईने पूर्णत्वास गेला असला तरी दरम्यानच्या काळात निजामाच्या विरोधात विविध संघटना व स्थानिक चळवळीनि निजामाच्या विरोधात जो लढा उभारला होता तो अद्वितीय असा होता. हैद्राबाद संस्थानाच्या स्वातंत्र्य लढ्याला अनेक पदर होते. यापैकीच आर्य समाज या सामाजिक धार्मिक क्षेत्रात सुधारणेसाठी स्थापन झालेल्या संघटनेने निजाम विरोधात जनमत तयार करण्याचे व प्रसंगी निजामाच्या सत्तेला थेट भिडण्याचे धाडस दाखवले. याच आर्य समाजाच्या संदर्भात विविध घटना वा प्रकरणे संस्थानभर उद्भवले. त्यापैकीच इ.स. १९३९ सालचे निलंगा आर्य समाज प्रकरण होय. या संस्थानामध्ये निजामविरोधी जनजागृतीचे कार्य विविध संस्था संघटनांच्या माध्यमातून झाले त्यापैकीच एक म्हणजे आर्य समाज होय.

हैद्राबाद संस्थानाच्या विरोधात स्वातंत्र्यासाठी आर्य समाजाने दिलेले योगदान अद्वितीय अशा स्वरूपाचे आहे. संस्थानांतील राजधानीच्या शहरापासून ते खेड्यापाड्यापर्यंत आर्य समाजाच्या शाखांचे जाळे विस्तारलेले होते. यामुळे जनजागृतीचे कार्यही तेवढ्याच व्यापक स्वरुपात झाले. या समाजाने सामाजिक-धार्मिक क्षेत्रात लोकजागृतीचे कार्य केले. परंतु त्याच्यावरही निजाम सरकारने ज्यावेळी दडपशाही लादण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी आर्य समाजाने सरकारच्या विरोधातही आवाज उठवला. त्यामुळे दडपशाही विरोधात, अन्यायाविरोधात आवाज उठवून लोकांमध्ये स्वातंत्र्याची भावना निर्माण करण्याचे श्रेय हे खऱ्या अर्थाने आर्य समाजालाच द्यावे लागते. निलंगा येथील आर्य समाजाने या संदर्भात केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. निजाम सरकारने दडपशाहीच्या माध्यमातून आर्य समाजाचे कार्य उध्वस्त करण्याचा जो प्रयत्न केला, त्याविरोधात निलंगा येथील आर्य समाजाने उभारलेला लढा हा अद्वितीय असा लढा होता, त्यात त्यांना यश मिळाल्यामुळे हा लढा हैद्राबाद संस्थानाच्या स्वातंत्र्य लढ्यात नवचैतन्य निर्माण करणारा ठरला. याच अनुषंगाने प्रस्तुत शोध निबंधात विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाची सुरुवात :**

आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी वैदिक धर्माच्या पुनरुत्थानासाठी 10 एप्रिल १८७५ रोजी गिरगावातील प्रार्थना समाजाच्या शेजारी असलेल्या डॉ. माणेकजी आर्देसर्जी या पारशी ग्रहस्ताच्या उद्यानात सायंकाळी साडेपाच वाजता आर्य समाजाची रीतसर स्थापना जाहीर सभेमध्ये केली. (जोशी श्रीपाद:१९९२:७८) हि संघटना मुळात वैदिक धर्माच्या पुरुत्थानासाठी स्थापन झालेली होती. संघटनेच्या स्थापनेमागील उद्देश धार्मिक व्यवस्थेत सुधारणा घडवून आणने हा होता. मुंबईत स्थापन झालेल्या आर्य समाजाच्या शाखा हळूहळू गुजरात, पंजाब व इतर प्रांतातही स्थापन झाल्या. आर्य समाजाने लाहोर, दिल्ली परिसरात आपल्या कार्याचा प्रभाव वाढवला होता. त्यामुळे दिल्ली, लाहोर ही आर्य समाजाची मुख्य केंद्र म्हणून नावारूपाला आली होती.

हैद्राबाद संस्थानात राजकीय परिस्थिती वेगळी होती. या ठिकाणच्या संस्थानिकाने संस्थानात स्थापन होणाऱ्या सामाजिक-धार्मिक संघटनांवर निर्बंध लादले होते. त्यामुळे या संस्थानात अशा प्रकारच्या संघटना स्थापन होऊ शकत नव्हत्या. अशा परिस्थितीतही आर्य समाजाची पहिली शाखा समाजाच्या स्थापनेनंतर अवघ्या पाच वर्षातच हैद्राबाद संस्थानाच्या बीड जिल्ह्यातील किल्ले धारूर येथे

इ.स. १८८० मध्ये स्थापन झाली होती. याबद्दल असे म्हटले जाते की, याठिकाणचे काही उत्तर भारतीय व्यक्ती पुणे येथे भरलेल्या स्वामी दयानंद सरस्वतींच्या सभेला उपस्थित होते. स्वामीजींच्या विचाराने प्रभावित होवून त्यांनी या परिसरातही वैदिक सिद्धांताचा प्रचार प्रसार झाला पाहिजे या उद्देशाने हैद्राबाद संस्थानात हि पहिली शाखा स्थापन झाली. (गर्जे चंद्रकांत:२००९:३१) तर पुढे अवघ्या दोनच वर्षांनी हैद्राबाद संस्थानाची राजधानी असलेल्या हैद्राबाद शहरातील सुलतान बाजार परिसरात आर्य समाजाची दुसरी शाखा १८९२ मध्ये स्थापन झाली. यावेळी आर्य समाजाचा मुख्य उद्देश हा संस्थानातील समाजात पसरलेली अंधश्रद्धा, जातीव्यवस्था, खऱ्या धर्माचा झालेला लोप.अनेक संप्रदायांचा झालेला उदय या विविध क्षेत्रात सुधारणेचे कार्य आर्य समाजाने सुरु केले. या शाखांचे जाळे संस्थानातील अनेक महत्वाच्या जिल्हा, तालुका स्तरापर्यंत विणल्या गेले. कारण हैद्राबाद हि संस्थानाची राजधानी होती त्यामुळे येथे कायद्याचे शिक्षण घेण्यासाठी मराठवाडा, कर्नाटक प्रांतांतून तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात जात असे. या तरुणांना सुलतान बाजार येथील आर्य समाजाच्या शाखेतून प्रेरणा मिळत असे.

**निलंगा येथे आर्य समाजाची स्थापना:**

हैद्राबाद संस्थानातील बिदर जिल्ह्यातील उदगीर या ठिकाणचे भाई बन्सीलालजी व भाई शामलालजी यांनी हैद्राबाद व धारूर या ठिकाणच्या आर्य समाजापासून प्रेरणा घेवून इ.स.१९२६ मध्य उदगीर येथे आर्य समाजाची शाखा स्थापन केली. (गर्जे चंद्रकांत:२००९:३११) निलंगा येथील तरुण शेषरावजी इ.स.१८२८ मध्ये उदगीर आर्य समाजाच्या वार्षिक उत्सवासाठी आपल्या तरुण मित्रांसोबत उपस्थित होते. यावेळी त्यांच्यावर भाई बन्सीलालजी व भाई श्यामलालजी या दोन भावांच्या व्यक्तिमत्वाचा, त्यांच्या क्रांतिकारी विचारांचा आणि सामाजिक,धार्मिक उपक्रमशील कार्याचा प्रभाव पडला. (गर्जे चंद्रकांत:२००९:५३) आर्य समाजाचे अनेक प्रतिनिधी निलंगा परिसरात प्रचार प्रसारासाठी येत असत. भाई बन्सीलालजी आणि शामलालजी निर्भय होऊन वैदिक धर्माचा प्रचार करत असत. त्यासाठी ते निलंगा परिसरातही येत असत. शेशेरावजी निलंगा येथे आर्य समाजाची शाखा स्थापन करू इच्छित होते. परंतु निजामाचा आर्य समाजाला विरोध होता. आर्य समाजाला संस्थानात वाढू न देण्याचे धोरण निजामाचे होते. त्याचबरोबर आर्य समाज मूर्तीपूजेला आणि सामाजिक रूढी परंपरांना प्रखर विरोध करत असे. त्यामुळे स्थानिक सनातनी मंडळींचाही आर्य समाजाच्या स्थापनेला विरोध होता. खुद्द शेषरावजी यांच्या मत-पित्याचाही त्यास विरोध होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत शेषरावजी यांनी हार न मानता आर्य समाजाच्या स्थापनेसाठी पुढाकार घेतला.

निजामाच्या दडपशाहीला न घाबरता भाई बन्सीलाल व शामलाल आर्य समाजाचा प्रचार करत असत. त्यांचे हे कार्य परिसरातील अनेक तरुणांना प्रेरणा देत असे. एकदा भाई बन्सीलालजी आर्य समाजाच्या प्रचारासाठी निलंग्यात आले होते. तेंव्हा तेथील पोलीस इन्स्पेक्टरने त्यांना न्यायालयाच्या परवानगीशिवाय प्रचार करता येणार नाही म्हणून अडवण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा भाई बन्सीलालजी त्यांच्यावर गरजले कि, "मला धर्मप्रचार करण्याचा जन्मसिद्ध अधिकार आहे. न्यायालयाला यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही." (गर्जे/कुलकर्णी अनु.:२०२३:१३) भाई बंसिलालजींच्या उत्साहपूर्ण प्रचाराने शेषरावजी आणि त्यांच्या साथीदारांना प्रेरणा मिळाली व त्यांनी आर्य समाज स्थापन करण्याचा निश्चय केला. त्यातूनच इ.स. १९३० मध्ये महादेवाच्या मंदिरात आर्य समाजाची स्थापना झाली. त्यात ४० सवर्ण लोक होते. अस्पृश्यांना महादेवाच्या मंदिरात येण्यास बंदी असल्याने ते आर्य समाजाच्या सत्संगाला येऊ शकत नव्हते. (गर्जे/कुलकर्णी अनु.:२०२३:१३) अशा प्रकारे आर्य समाज निलंगा येथे स्थापन झाला. आर्य समाज सामाजिक विषमता व जातिभेदाचा विरोध करीत असे. मात्र निलंगा येथे आर्य समाज महादेव मंदिरात असल्यामुळे अस्पृश्यांना यात सामावून घेणे शक्य होत नव्हते. अशा परिस्थितीत अस्पृश्यांना दूर ठेवून कार्य करणे आर्य समाजाच्या तत्वाविरुद्ध होते. म्हणून त्यांनी आर्य समाजासाठी स्वतंत्र

जागेची आवश्यकता भासू लागली. त्याचा शोध शेषरावजींनी सुरु केला.

निलंगा गावात माधवराव भोज यांचे पुढे मोकळी जागा असलेले एक रिकामे घर होते. तिथे भुते राहतात असा समज पसरल्यामुळे तिथे कुणीच राहत नव्हते. अशा परिस्थितीत शेषरावजी यांनी भोज यांच्याकडे ही जागा आर्य समाजासाठी मागितली. भोज यांनी काहीही हरकत न घेता ती जागा एक रुपया भाड्याने देण्याचे मान्य केले.आर्य समाजासाठी ही जागा घेवून शेषरावजी यांनी आर्य समाजाचा भूताखेतावर विश्वास नाही हे सिद्ध केले. (गर्जे/कुलकर्णी अनु.: २०२३:१३-१४) त्यातून आर्य समाजाचा अंधश्रद्धा न मानण्याचा मूळ विचार निलंगा आर्य समाजाच्या माध्यमातून शेषराव वाघमारे यांनी स्वीकारलेला होता हे लक्षात येते. एवढेच नाही तर निलंगा परिसरातील विविध देवी-देवतांच्या उत्सवामध्ये प्राण्यांची बळी देण्याची प्रथा होती. या प्रथेच्या विरोधातही आर्य समाजाने कार्य केले होते. त्यामुळे सामाजिक जनजागृती घडून आली आणि अनेक तरुण आर्य समाजाला जोडले गेले. यामुळेच निलंगा परिसरात शेषराव आणि त्यांच्या समविचारी मित्रांनी मिळून आर्य समाजाच्या शाखा स्थापन केल्या. त्यात कासार सिरसी, मदनसुरी, हणमंतवाडी, अंबुलगा, पानचिंचोली या गावांमध्ये आर्य समाजाची शाखा स्थापन करण्यात आली. या आर्य समाजांमध्ये दरवर्षी वार्षिकोत्सव, विविध व्याख्यानांच्या कार्यक्रमांसाठी विद्वानांना निमंत्रित केले जाई. त्यांची विद्वत्तापूर्ण भाषणे लोकांमध्ये होत असत. (भालेराव:१९८७:१२९) यामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात सामाजिक-धार्मिक जनजागृती घडून आली.

**निलंगा आर्य समाज प्रकरण:१९३५**

आर्य समाजाच्या स्थापनेसोबतच शेषरावजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आर्यकुमार सभेचीही स्थापना केली होती. त्याचबरोबर आर्य समाजामध्ये वाचनालय, व्यायामशाळा उघडण्यात आली. प्रार्थनेसोबतच मानसिक व शारीरिक सामार्थ्याकडेही आर्य समाजाने लक्ष दिले होते. यामुळेच या परिसरातील तरुणांमध्ये देशभक्तीची भावनाही निर्माण झाली होती. शेषरावजी स्वत: आर्य समाजाचे कट्टर कार्यकर्ता होते. कुशल संघटक होते. व्यायामाने त्यांनी शारीरिक सामर्थ्य कमावलेले होते. ते आर्य समाजामध्ये युवकांना आखाड्यात काठी, भला, बरछी, तलवार चालवणे त्याचबरोबर व्यायाम, योगसंध्या इत्यादींचे प्रशिक्षण देत असत.(गर्जे:२००९:६१) यामुळे तत्कालात तरुण वर्ग विधायक कार्य करीत असत आणि आर्य समाजाच्या संघटनात्मक विकासात योगदान देत असत.

हैद्राबाद संस्थानाचा संस्थानिक निजामाचे धोरण मात्र यावेळी दडपशाहीचे होते. आपल्या संस्थानात सामाजिक-धार्मिक संघटना विकसित होऊ नये याकडे त्याचे विशेष लक्ष होते. त्यातच संस्थानात आर्य समाजाचा विस्तार मोठ्या प्रमाणात होत असल्याने आर्य समाजाच्या हालचालींवर आर्य निजाम व प्रशासनाचे विशेष लक्ष होते. निलंगा आर्य समाजावर देखील गुप्तचर विभागाची सतत नजर होती. खुदादोस्त खान कॉन्स्टेबल नं.९४ निलंगा पोलीस स्टेशन मध्ये खास याच कामासाठी नेमलेला होता. त्याने जून १९३३ मध्ये त्याच्या वरिष्ठाला जिल्हाधिकारी बिदर याला निलंगा आर्य समाजाच्या हालचाली कळवल्या. (गर्जे,कुलकर्णी: २०२३:२०) यामध्ये आर्य समाजाचे अध्यक्ष शेषराव वकील यांच्या अध्यक्षतेखाली हा समाज चालत असून रात्रीच्या वेळेत भाषणे होतात. वाचनालय व व्यायामशाळा उघडल्या आहेत. अशी माहिती त्यांनी दिल्यानंतर आर्य समाजाच्या हालचालींवर अधिक पळत ठेवण्यात येऊ लागली.

आर्य समाजाचे नावनिशान राहू द्यायचे नाही असा जणू चंगच बांधला होता. कर्नाटकाच्या बिदर जिल्ह्यात असलेल्या निलंग्याचा आर्य समाज जुना आणि शक्तिशाली होता. (भालेराव: २००१:१३०) बिदरचे तत्कालीन अव्वल तालुकदार (कलेक्टर) मौलवी मिर्झा गुलाम महमूद बेग यांनी हा समाज व तेथे चालणारा आखाडा सरकारविरोधी राजकारणाचे केंद्र आहे असा माझा विचार आहे. अशा प्रकारचे कार्यक्रम मोठी शक्ती धारण करतील आणि इतस्त्र पसरून सर्वत्र अराजकता वाढेल जातीय दंगली होतील यासाठी आदेश देतो की, "तो आखाडा व समाज बरखास्त

करा. इमारत व आखाडा विनापरवानगी आहेत. ते सर्व पडून टाका. समान जप्त करा. सरकारात जमा करा." (गर्जे,कुलकर्णी:२०२३:२१) अर्थात या आदेशासाठी सांगितलेल्या कारणांपैकी कोणतेही कारण योग्य नव्हते. आर्य समाज हा राजकीय क्षेत्रात कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करत नव्हता तर सामाजिक-धार्मिक क्षेत्रात समाजामध्ये निर्माण झालेले समाजविघातक प्रथा दूर करण्याचा प्रयत्न करीत होता. त्यासाठी युवकांच्यामध्ये मानसिक व शारीरिक स्वास्थ्य निर्माण करण्याचे कार्य चालू होते. त्याचबरोबर युवकांना निर्व्यसनी बनवण्यासाठी जीवनमूल्य शिकवण्याचे काम समाजामार्फत शेषरावजी करीत होते. परंतु या कार्यास सरकारविरोधी कार्य समजून बिदरच्या अव्वल तालुकदारने हा आदेश दिला. त्यानुसार निलंग्याच्या तालुकदारने २९ जून १९३९ रोजी आर्य समाज इमारत पाडली आणि हवनकुंड उखडून टाकण्यात आले. (गर्जे: २००९:७४)

**आर्य समाज भवनसाठी संवैधानिक संघर्ष:**

आर्य समाज पाडण्यासंदर्भात कसलीही पूर्व सूचना देण्यात आली नव्हती. अचानकपणे झालेल्या या घटनेमुळे शेषराव वाघमारे आणि त्यांचे सहकारी रामराव हलगरकर यांच्यात चर्चा झाली आणि निलंगा अव्वल तालुकदारकडे मागणी केली की, कोणत्या कारणांमुळे आर्य समाज भवन पाडण्यात आले. (गर्जे: २००९:७४) या घटनेची माहिती उदगीर येथील आर्य समाज व पंडित बन्सीलालजीना त्याच बरोबर हैद्राबाद आर्य प्रतिनिधी सभेलाही देण्यात आली. त्यामुळे या घटनेचे पडसाद संस्थानात उमटावयास लागले. त्याचबरोबर बन्सीलालजी यांनी ०२/०७/१९३९ला सर्वदेशीक सभा, दिल्लीला तारेने या घटनेची माहिती दिली. तारेचा आशय होता, "तहसीलदाराने निलंग्याचा आर्यसमाज पाडला आणि हवन कुंड नष्ट केले. हैद्राबाद आर्य प्रतिनिधी सभेचे प्रधान श्री विनायकराव विद्यालंकरांनी सर्वदेशिक सभेला तारेने कळविले कि, कायद्याचे पालन न करता धार्मिक संस्था आर्यसमाज भवन पाडले. समाजाची धार्मिक कार्ये थांबतील. या घटनेची चौकशी करून न्याय मिळवून द्यायला हवा." (गर्जे,कुलकर्णी:२०२३:२२) या शिवाय निलंगा आर्य समाजाच्या वतीने रामराव वकील यांनी आर्य समाज भवन पाडण्याच्या घटनेचे सविस्तर वर्णन आणि निर्माण झालेल्या परिस्थितीचे सविस्तर वर्णन केले. आर्य सामाजी लोकांवर होत असलेले अन्याय अत्याचार इत्यादींबद्दलची सविस्तर माहिती दिली.

या सर्व पत्रव्यवहारामुळे निलंगा आर्य भवन पडल्याचे पडसाद संस्थानासोबतच भारतभर उमटू लागले. सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेने हैद्राबाद आर्य प्रतिनिधी सभेला या प्रश्नी लक्ष देण्यासाठी सूचना केली. एवढेच नाही तर यासंदर्भात हवी ती मदत देण्याचे सार्वदेशिक सभेने कळवले होते. या पत्रात म्हटले होते की, "जी काही कायदेशीर कार्यवाही करायची ती श्री विनायकराव विद्यालंकारजींच्या संमतीने करा. दिल्लीहून पं. केशवदेवजी ज्ञानी यांना पाठविण्यात येत आहे. आमची इच्छा आहे की, तुम्ही तसेच स्थानिक प्रमुख कार्यकर्ते मिळून तेथील काय परिस्थिती आहे, ते पाहून योग्य निर्णय घ्या. निलंगातूंच आंदोलनाची सुरुवात करायची असेल तर घाबरू नका पण एवढे अवश्य लक्षात घ्या की, एकदा आंदोलन सुरु केल्यानंतर मध्येच थांबवू नका." (गर्जे,कुलकर्णी:२००९:२३) या आदेशानुसार हैद्राबाद आर्य प्रतिनिधी सभा यांच्या व पं. बन्सीलालजी यांच्याशी विचारविनिमय करून शेषरावजी व त्यांच्या साथीदारांनी सर्वानुमते आर्य समाज भवनची नुकसानभरपाई भरून घेण्यासाठी सरकारच्या विरोधात संवैधानिक मार्गाने आंदोलन करण्याचे ठरवले. त्यानुसार "आर्य समाज निलंग्याच्या घर मालकाकडून नुकसान भरपाईची दावा करायचा. हवन कुंड तोडणे व समान जप्त केल्याबद्दल आर्यसमाज निलंगा कडून फौजदारी कार्यवाही करायची. दैनिक संध्या, हवन, उपदेश पडलेल्या जागेतच सुरु करायचे. तहसील व पोलीस अधिकाऱ्यांना चौकशीसाठी अर्ज द्यायचा, स्मरणपत्रे द्यावीत. आर्य प्रतिनिधी सभा हैद्राबादतर्फे युद्ध समिती स्थापन करावी. पूज्य स्वामी स्वतंत्रतानंद्जी आल्यानंतर त्यांना बिदर जिल्हा संग्ठनाचा प्रभार दिला जावा. त्यांच्या सोबत बन्सीलालजींना ठेवावे." (गर्जे,कुलकर्णी:२००९:२३-२४) इत्यादी निर्णय घेण्यात आले.

या सर्व निर्णयांना सर्वदेशिक सभेने आशीर्वाद दिले होते. त्यानुसार पं. बन्सीलालजी यांच्या मार्गदर्शनाखाली शेषराव वकील यांनी निलंगा येथेच संवैधानिक आंदोलनाची सुरुवात केली. त्याचाच भाग म्हणून त्यांनी मिर्जा गुलाम महमूद बेग अव्वल तालुकदार बिदर यांच्या विरोधात वैयक्तिक फौजदारी गुन्हा दाखल केला. (गर्जे:२००९:८८) निलंगा आर्य समाज प्रकरण संपूर्ण संस्थानभर चिघळले. त्याचे पडसाद ठिकठिकाणच्या आर्य समाजात उमटू लागले. त्यामुळे या आंदोलनास सामुहिक पाठींबा मिळू लागला. धार्मिक काम करणाऱ्या आर्य समाजाला दडपून टाकू पाहणाऱ्या अधिकाऱ्याच्या विरोधात लोक आवाज उठवू लागले. एवढेच नाही तर त्यावेळच्या वर्तमान पत्रांमध्येही त्यचे पडसाद उमटू लागले होते. समाज कि दुनिया या उर्दू वृत्तपत्राने कलेक्टर बिदरच्या विरोधात 'आर्य समाजाचा प्रखर विरोध' या मथळ्याखाली लिहिले की, आर्य समाज आपल्या धार्मिक अधिकाराच्या रक्षणासाठी कोणत्याही प्रकारच्या बलिदानासाठी तयार आहे.' वैदिक आदर्श या उर्दू वृत्तपत्रानेही कलेक्टर बिदरचा निषेध केला. (गर्जे,कुलकर्णी:२००९:२५) वृत्तपत्रांनी निलंगा आर्य समाजाबद्दल घेतलेल्या या भूमिकेमुळे निजामाने या वृत्तपत्रांवर बंदी घातली आणि आपली दडपशाही सुरूच ठेवली.

निजामाच्या दडपशाहीला न जुमानता आर्य समाजाने आपला लढा चालूच ठेवला. एवढेच नव्हे तर देशभरातल्या आर्य समाज शाखांनी या घटनेचा निषेध सुरु केला. निलंगा आर्य समाजाला पत्राद्वारे पाठींबा जाहीर केला. अशा पद्धतीने चोहोबाजूंनी या प्रश्नाबद्दल रान उठवून निजामाचे याकडे लक्ष वेधण्याचे हे काम आर्य समाजाच्या देशभरातील शाखांनी केला. याबद्दल निजामाच्या काही अधिकाऱ्यांनी संस्थानातला हा विषय संस्थानाबाहेर दिल्लीपर्यंत गेल्याबद्दल जाब विचारून पुन्हा दडपण आणण्याचा प्रयत्न केला. परंतु यासंदर्भात पं. बन्सीलालजी यांनी दिलेले उत्तर महत्वपूर्ण आहे. 'आर्य समाजाची दिल्ली येथील शाखा आमची सर्वोच्च शाखा आहे. आम्हाला दररोजच्या घटनाक्रमाची माहिती त्यांच्यापर्यंत पाठवावी लागते. आम्ही अजून पर्यंत हा विषय ब्रिटीश रेसिडेंट अथवा व्हाईसरॉय साहेबांपर्यंत नेलेला नाही. आम्ही आमचे काम करत आहोत.' (गर्जे:२००९:९१) या उत्तरानुसार हा विषय आर्य समाजाच्या पातळीवरच देशभर पसरलेला होता आणि देशभरातून पाठींबा याला मिळत होता. यामुळे सर्वसामान्य जनतेतही निजाम सरकारच्या आर्य समाज भवन पाडण्याच्या या कृत्याबद्दल रोष निर्माण झाला होता. हे पाहून निलंगा तालुकदार, बिदरचा अव्वल तालुकदार आणि निजाम शासनाने भयभीत होवून नरमाईने वागण्याचा प्रयत्न सुरु केला. तहसीलदार निलंगा यांनी निलंगा आर्य भवनाच्या पुनर्निर्मितीसाठी २०० रु. देवून हा विषय मिटवण्याचाही प्रयत्न झाला परन्तु आर्य समाजाने न्याय मिळवण्यासाठी आपला लढा चालूच ठेवला.

निजाम सरकारच्या बिदर येथील अव्वल तालुकदारने कसल्याही प्रकारची पूर्व कल्पना न देता नियमबाह्य स्वरुपाची कार्यवाही करून आर्य समाज भवन पडल्याबद्दल देशव्यापी विरोध झाला. हा विरोध दिवसेंदिवस वाढतच होता. यामुळे तत्कालीन निजाम सरकारचे 'सचिव नवाब जुलकदर जंग यांनी हतबल होवून दि.२८ सप्टेंबर १९३५ रोजी निर्णय दिला की, अव्वल तालुकदारचा निर्णय अन्यायपूर्ण होता. त्यामुळे आपल्या खाजगी संपत्तीतून आर्य समाज मंदिराची पुन्हा निर्मिती करून द्यावी. हवन कुंड बांधून द्यावे आणि जप्त केली सामान परत करावे. या आदेशाचे पालन तत्काळ करावे.' (गर्जे:२००९:९६) हा निजाम सरकारच्या सचिवाचा आदेश म्हणजे आर्य समाजाच्या संवैधानिक लढ्याचे यश होते. हा संपूर्ण लढा शांततेच्या आणि संवैधानिक मार्गाने लढला गेला होता. या लढ्यासाठी सार्वदेशिक सभा, प्रांतीय सभा व अनेक ठिकाणच्या आर्य समाजानी आपआपल्या पातळीवर निषेध केला त्यामुळे हा प्रश्न व्यापक बनला आणि निजाम सरकारला नुकसानभरपाई देण्याचे आणि भवन पूर्ववत करून देण्याचे आदेश बिदरच्या अव्वल तालुकदारला द्यावे लागले.

नवाब जुलकदर जंग यांच्या आदेशानंतर पं. बन्सीलालजी यांनी निलंगा आर्य समाजाला सूचना केली

की, 'इमारत पूर्वी जशी होती तसी बांधून घ्या, तुम्ही निगराणी करा.दगड तेथेच पडले आहेत, तहसीलदार माती आणून देतील व मजुरांचा खर्च करतील, यामध्ये काही कुणी, कमतरता करीत असल्यास आम्हाला कालवा. जप्त केलेले समान परत घ्या. संपूर्ण इमारतीचे बांधकाम झाल्यानंतर मोठा समारंभ आयोजित करा, विद्वान वक्ते व खूप कार्यकर्ते बोलवा. पैशाची काळजी करू नका.'(गर्जे,कुलकर्णी:२००९:२६) या पत्राद्वारे बन्सीलालजी यांनी निलंगा आर्य भवनच्या पुनर्बांधणीसाठी दिलेल्या सूचना आणि आर्य समाजाने उत्साहाने काम करण्याचा दिलेला सल्ला महत्वाचा होता. त्यानुसार आर्य समाज मंदिर पुन्हा निर्माण करवून घेण्यात आले. या संपूर्ण लढ्यात निलंगा आर्य समाजाचे प्रमुख वकील शेषराव वाघमारे यांनी केलेले नेतृत्व, संवैधानिक चाकोरीतून लढलेला लढा महत्वाचा आहे. या लढ्याला मिळालेल्या यशामुळे आणि निजाम शासन व त्यांच्या अधिकाऱ्यांच्या पराजयामुळे संपूर्ण आर्य चळवळीला एकप्रकारचे नवचैतन्य प्राप्त झाले. हि घटना हैद्राबाद संस्थानातील आर्य समाजाच्या दृष्टीने आणि निजामविरोधी चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहे.

सरांशता, निलंगा आर्य समाज विध्वंस प्रकरण हे हैद्राबाद मुक्ती संग्रामातील एक रोमहर्षक प्रकरण होय. या प्रकरणाने हैद्राबाद संस्थानाविरोधातील स्वातंत्र्य लढ्यात एक महत्वाची भूमिका बजावली. साधारणता हैद्राबाद संस्थानात स्वातंत्र्य लढ्याची सुरुवात इ.स. १९३८ पासून म्हणजेच हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसच्या स्थापनेपासून मानली जाते. परंतु आर्य समाजाने निलंगा येथे आपल्या संघटनेच्या माध्यामतून संघटना स्वातंत्र्याचे व सामाजिक धार्मिक स्वातंत्र्याचे रणसिंग त्याआधीच फुंकले होते. किंबहुना आपले हे स्वातंत्र्य निजाम सरकारकडून मिळवून घेतले होते हे या लढ्याचे विशेष होय. हा लढा नंतरच्या निजाम सत्तेविरोधातील स्वातंत्र्य लढ्यात प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरला म्हणून हे प्रकरण अद्वितीय असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१. भालेराव अनंत. (२००१). हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा. मौज प्रकाशन, मुंबई.
२. गर्जे चंद्रकांत. (२००९) (हिंदी) वीर सेनानी-आर्य नेता श्री शेषराव वाघमारे, स्मृती रौप्य महोत्सव समिती, आर्यसमाज निलंगा जि.लातूर.,
३. गर्जे चंद्रकांत, कुलकर्णी नारायण (अनु.), (२०२३), दख्खनचा शेर:शेषराव वाघमारे, पं. नरेंद्र वैदिक अनुसंधान केंद्र स्वामी श्रद्धानंद गुरुकुल, परळी (वै.) जि. बीड.,
४. भालेराव अनंत. (२००८) हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा. मौज प्रकाशन, मुंबई ,
५. चपळगावकर नरेंद्र. (२०१२) महाराष्ट्राचे शिल्पकार अनंत भालेराव, महाराष्ट्र साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई.
६. लोखंडे चंद्रशेखर. (२०२२) मराठवाड्याचा मुक्तीलाधा आणि हैद्राबाद संस्थान.विद्याभारती प्रकाशन, लातूर.,
७. कुरुंदकर नरहर (१९९८). हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन.रजत प्रकाशन औरंगाबाद.,
८. स्वामी रामानंद तीर्थ. (अनु-देऊळगावकर वि.प.). (१९९८) हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामाच्या आठवणी, स्वामी रामानंद तीर्थ स्मारक समिती, हैद्राबाद.
९. पाठक अरुणचंद्र (संपा.). (२००८) महाराष्ट्र राज्य गेझेटीअर लातूर जिल्हा भाग १, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन मुंबई

*****